# मराठा आरक्षणाचा एल्गार मुंबईत धडकणार; प्रवीण दरेकरांचे जरांगे पाटलांना महत्त्वाचे आवाहन

साप्ताहिक
दर्शक
E-mail : weeklydarshak@gmail.com R.N.I.NO.MAH/MAR/2000/02266
वर्ष ४२ अंक नं - ४ पाने ४ सोमवार ७ सप्टेंबर २०२६ किंमत २ रु

छत्रपती संभाजीनगर:मराठा आरक्षणाच्या मुद्द्यावर मनोज जरांगे पाटील यांनी पुन्हा एकदा आक्रमक पवित्रा घेत 19 सप्टेंबरपासून मुंबईतील आझाद मैदानावर आमरण उपोषणाची हाक दिली आहे. 15 सप्टेंबरला अंतरवाली सराटी येथून पाटोदा, श्रीगोंदा, हडपसर आणि खोपोली मार्गे हा मोर्चा मुंबईत दाखल होणार आहे. जरांगेंच्या या एल्गारानंतर सत्ताधारी महायुतीतून पहिली मोठी प्रतिक्रिया समोर आली असून भाजपचे ज्येष्ठ नेते व आमदार प्रवीण दरेकर यांनी सरकारची भूमिका स्पष्ट केली आहे. "मराठा समाजाचे प्रश्न अत्यंत गंभीर असून सरकार सुरुवातीपासूनच यावर सकारात्मक आहे," असे सांगत दरेकर यांनी जरांगे यांच्या बहुतांश मागण्या पूर्ण झाल्याचा दावा केला.दरेकर यांच्या निवेदनाचे महत्त्वाचे मुद्दे:12 मागण्या पूर्ण: मराठा आंदोलकांच्या 14 पैकी तब्बल 12 मागण्या सरकारने मान्य केल्या आहेत. उर्वरित 1-2 मागण्या या कायदेशीर चौकटीत अडकलेल्या असून, त्यावरही तोडगा काढण्यासाठी सरकारचा प्रामाणिक प्रयत्न सुरु आहे.चर्चेची दारे खुली:



सरकारने जरांगे यांच्याशी सातत्याने संवाद साधला आहे. आजही महायुती सरकार कोणत्याही टप्प्यावर चर्चेसाठी तयार आहे.इतिहासातील सर्वात मोठे काम: देवेंद्र फडणवीस, मुख्यमंत्री एकनाथ शिंदे आणि अजित पवार यांनी मराठा समाजासाठी जेवढे निर्णय घेतले, तितके निर्णय भूतकाळात एकाही सरकारच्या काळात झालेले नाहीत. गणेशोत्सवाचे भान ठेवण्याचे आवाहन: लोकशाहीत मुंबईत येऊन आंदोलन करण्याचा सर्वांना अधिकार आहे. मात्र, सध्या गणेशोत्सव हा मोठा श्रद्धेचा सण सुरु आहे. छत्रपती शिवाजी महाराजांचा आदर्श मानणाऱ्या या समाजाने आपल्या आंदोलनामुळे हिंदू सणाला किंवा इतर नागरिकांना अडचण येणार नाही, याची काळजी घ्यावी.शांततेचे आवाहन: मराठा समाजाने याआधी शांततापूर्ण आणि शिस्तबद्ध मूक मोर्चे काढून जगाला आपली ताकद दाखवली आहे. त्यामुळे आगामी आंदोलनादरम्यान राज्यात कुठेही अराजकता किंवा तणाव निर्माण होणार नाही, याची दक्षता आंदोलकांनी घ्यावी. राधाकृष्ण विखे पाटील, उदय सामंत, आणि प्रसाद लाड या नेत्यांनी वेळोवेळी जरांगे यांची भेट घेऊन चर्चा केली आहे. "कोणी भेटायला येते यापेक्षा प्रश्न सुटणे महत्त्वाचे असून सरकारने बहुतांश प्रश्न सोडवले आहेत," असे दरेकर म्हणाले. आता मनोज जरांगे पाटील या आवाहनाला काय प्रतिसाद देतात, याकडे संपूर्ण राज्याचे लक्ष लागले आहे.

## पेपरफुटीला कायमचा पूर्णविराम! राज्यात नवा मास्टरप्लॅन

पुणे | राज्यातील सरकारी भरती परीक्षांमध्ये सातत्याने होणारे पेपर-फुटीचे प्रकार रोखण्यासाठी राज्य सरकारने गठित केलेल्या उच्चस्तरीय टास्क फोर्सने (कृती समिती) मोठा निर्णय घेतला आहे. 'नो पेपर, नो लीक' या नव्या सूत्राच्या आधारे आता थेट आयत्यावेळी प्रश्नपत्रिकांची निर्मिती केली जाणार आहे. पुण्यात आयोजित पहिल्या 'विद्यार्थी संवाद सत्रानंतर' टास्क फोर्सच्या अध्यक्षा आणि सामान्य प्रशासन विभागाच्या अपर मुख्य सचिव व्ही. राधा यांनी पत्रकारांशी बोलताना ही माहिती दिली. कसा असेल नवा फॉर्म्युला?साखळीच मोडीत काढणार: प्रश्नपत्रिकांची निर्मिती, छपाई, वाहतूक आणि केंद्रांवरील वितरण अशा अनेक टप्प्यांवर गळतीचा मोठा धोका असतो. ही संपूर्ण साखळीच मोडीत काढून ही माहिती कोणालाही मिळणार नाही अशी गोपनीय व्यवस्था उभारली जाईल. आयत्यावेळी निर्मिती प्रश्नपत्रिकांची निर्मिती थेट शेवटच्या क्षणी (आयत्या-वेळी) आणि अत्याधुनिक तंत्रज्ञानाच्या मदतीने केली जाईल. जर प्रश्नपत्रिका आधी अस्तित्वातच नसेल, तर ती फुटण्याचा प्रश्नच येत नाही! एमपीएस-सीचे सक्षमीकरण: सध्या 'गट-क' पर्यंतच्या परीक्षा MPSC द्वारे घेतल्या जातात, मात्र पुरेसे मनुष्यबळ व आयटी इन्फ्रास्ट्रक्चर नसल्याने आधी एमपीएससीला सक्षम करण्यावर भर दिला जाईल.ऑफलाईन परीक्षा ओएमआर (O M R) शीटवर: वर्षभरापर्यंत परीक्षा ऑफलाईन पद्धतीनेच O M R शीटवर घेण्यात येतील.

## शिक्षण हक्क कायद्याच्या प्रभावी अंमलबजावणीसाठी देखरेख प्रणाली विकसित करणार – मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस

मुंबई, दि. 12: महाराष्ट्रातील सार्वजनिक चॅरिटेबल ट्रस्टद्वारे चालविल्या जाणाऱ्या शाळांमध्ये शिक्षण हक्क कायद्याची (R T E) प्रभावी व पारदर्शक अंमलबजावणी व्हावी, यासाठी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या पुढाकाराने महत्त्वाचे पाऊल उचलण्यात आले आहे.राज्यातील अशा सर्व अनुदानित आणि विना अनुदानित शाळांवर नियंत्रण व देखरेख ठेवण्यासाठी मानक कार्यप्रणाली, संनियंत्रण आणि मूल्यमापन यंत्रणा तातडीने विकसित करावे. धर्मदाय रुग्णालयातील कार्यपद्धतीप्रमाणे धर्मदाय संस्था अंतर्गत कार्यरत शाळांमध्ये शिक्षण हक्क कायद्याच्या प्रभावी अंमलबजावणीसाठी देखरेख कार्यपद्धतीची कायदेशीर प्रक्रिया वेगाने पूर्ण करावी. महाराष्ट्रा मध्ये सार्वजनिक चॅरिटेबल ट्रस्टच्या माध्यमातून मोठ्या प्रमाणावर शाळांचे संचालन केले जाते. या शाळांमध्ये शिक्षण हक्क कायद्यांतर्गत आर्थिकदृष्ट्या दुर्बल व



वंचित घटकांतील मुलांना प्रवेश मिळणे अनिवार्य आहे. मात्र, या शाळांमधील पारदर्शकता आणि नियमावलीच्या अंमल बजावणी बाबत वारंवार तक्रारी समोर येत होत्या.या पार्श्वभूमीवर, राज्यातील सर्व गरजू आणि पात्र विद्यार्थ्यांना आरटीई कायद्याचा प्रत्यक्ष लाभ मिळावा आणि शिक्षणाचा दर्जा कायम राहावा, यासाठी एक आधुनिक व डिजिटल प्रणाली अस्तित्वात आणणे अत्या-वश्यक आहे. सार्वजनिक 'चॅरिटेबल ट्रस्ट'द्वारे चालविल्या जाणाऱ्या रुग्णालयांमध्ये गरीब रुग्णांना मोफत व सवलतीच्या दरात आरोग्य सुविधा मिळतात की नाही, यावर नियंत्रण यंत्रणेद्वारे देखरेख ठेवली जाते, त्याच धर्तीवर आता शाळांसाठीही ही यंत्रणा लागू केली जाणार आहे.मुख्यमंत्र्यांच्या या विशेष प्रयत्नांमुळे राज्यातील हजारो शाळांमधील प्रवेश प्रक्रिया, शैक्षणिक सोयी-सुविधा आणि आरटीई अंतर्गत मिळणाऱ्या निधीचा योग्य वापर यावर थेट प्रशासकीय लक्ष राहील. तसेच या यंत्रणेद्वारे शाळांचा नियमित आढावा घेणे शक्य होणार असून, गैरप्रकारांना आळा बसण्यास मोठी मदत होणार आहे.ही प्रणाली लवकरात लवकर कार्यान्वित करण्यासाठी विधि व न्याय विभाग, आवश्यक ते तांत्रिक तज्ज्ञ यांच्यामध्ये योग्य तो विचार विनिमय करून एक सर्वसमावेशक प्रस्ताव तयार करण्याचे निर्देश देण्यात आले आहेत. हा प्रस्ताव तयार झाल्यानंतर त्याला आवश्यक त्या आर्थिक मंजुऱ्या देऊन तातडीने अंमलबजावणी सुरु केली जाणार

### बसस्थानकावर चोरी करणाऱ्या पाच महिलांना रंगेहात पकडल

नगर (प्रतिनिधी) – तारकपूर बस स्थानकात एसटी बसमध्ये प्रवास करत असताना एका महिला प्रवाशाच्या पर्समधून २२ हजार रुपयांची रोकड लांबवल्याची घटना घडली. या प्रकरणी सतर्कतेमुळे चोरट्या महिलांना रंगेहात पकडण्यात पोलिसांना यश आले आहे. उषा अर्जुन चौधरी (रा. ज्ञानेश्वर नगर, पाईपलाईन रोड, नगर) या काल शुक्रवारी (११ सप्टेंबर) नेवासा फाट्यावरून नगरकडे जाणाऱ्या छत्रपती संभाजीनगर ते ठाणे एसटी बसमध्ये प्रवास करत होत्या. बस तारकपूर बस स्थानकात आल्यावर त्या खाली उतरत असताना, त्यांची पर्स कोणीतरी ओढत असल्याची त्यांना जाणीव झाली. त्यांनी तत्काळ संबंधित महिलेचा हात पकडला, मात्र तिने तो झटका देऊन सोडवला. यादरम्यान पर्सची चेन उघडी असल्याचे दिसून आल्याने त्यांनी तपासले असता, आतील २२ हजार रुपयांची रोख रक्कम गायब असल्याचे लक्षात आले. उषा चौधरी यांनी तातडीने बसमध्ये चोर, चोर अशी आरडाओरडा केला. बस वाहकाने सर्व प्रवाशांना जागीच थांबवल्याने मोठी मदत झाली. चौधरी यांनी तत्काळ डायल ११२ वर फोन करून पोलिसांना पाचारण केले. घटनास्थळी आलेल्या तोफखाना पोलिस ठाण्याच्या पथकाने बसमधील चालक, वाहक आणि प्रवाशांच्या मदतीने संशयित महिलांची तपासणी केली.

### ब्रिक्स शिखर परिषदेच्या समारोप सत्रात दिल्ली घोषणा 2026 ला एकमताने मंजुरी

ब्रिक्स शिखर परिषदेच्या समारोप सत्रात दिल्ली घोषणा 2026 ला एकमताने मंजुरी देण्यात आली. पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी सदस्य देशांसमोर घोषणेचा मसुदा सादर केला आणि कोणत्याही देशाला काही आक्षेप आहे का, असे विचारले. कोणत्याही सदस्य देशाने आक्षेप न घेतल्याने, ही घोषणा एकमताने स्वीकारण्यात आली. घोषणेमध्ये ब्रिक्सची भविष्यातील दिशा आणि जागतिक व प्रादेशिक मुद्द्यांवर सदस्य देशांची सामायिक भूमिका स्पष्ट केली. मोदी म्हणाले की, ही घोषणा शिखर परिषदेदरम्यान झालेल्या चर्चेचे सार आणि ब्रिक्स सहकार्य पुढे नेण्यासाठीचे प्राधान्यक्रम दर्शवते.आपल्या समारोप भाषणात मोदी म्हणाले की, ब्रिक्स देशांमध्ये विविध मुद्द्यांवर मतांतर असले तरी, सहकार्यासाठीची सामायिक वचनबद्धता स्पष्टपणे दिसून येते. ते म्हणाले की, जग वेगाने बदलत आहे आणि जुन्या संस्था या बदलत्या जगाला सांभाळू शकत नाहीत. मोदींनी जागतिक संस्थांमधील प्रतिनिधित्व, उत्तरदायित्व




आणि नियम-निर्मिती प्रक्रियेत सुधारणा करण्याच्या गरजेवर भर दिला. ते म्हणाले की, बदलत्या जागतिक गरजांनुसार या संस्थांमध्ये सुधारणा करणे आवश्यक आहे.दिल्ली जाहीरनाम्यात कोणत्या घोषणा आणि ठराव करण्यात आले?ब्रिक्स देशांनी युद्ध आणि संघर्ष टाळण्यासाठी प्रयत्न तीव्र करण्याच्या गरजेवर भर दिला. हे करण्यासाठी, विवादांच्या मूळ कारणांपर्यंत पोहोचून ते सोडवण्यावर भर देण्यात आला.सदस्य देशांनी संवाद, परस्पर सल्लामसलत आणि मुत्सद्देगिरीद्वारे आंतरराष्ट्रीय विवाद सोडवण्याच्या आपल्या वचनबद्धतेचा पुनरुच्चार केला.ब्रिक्सने जागतिक समस्यांसाठी बहुपक्षीय दृष्टिकोनाचे आवाहन केले,(पान 2 वर)

### नगरमध्ये अन्न व औषध प्रशासनाची मोठी कारवाई: तब्बल 3.95 कोटी रुपयांचे बटर जप्त

नगर:सणासुदीच्या पार्श्वभूमीवर अन्न व औषध प्रशासनाने (FDA) अन्न भेसळीविरोधात धडक मोहीम सुरु केली आहे. याच मोहिमेअंतर्गत एम.आय.डी.सी. अहिल्यानगर येथील 'मे. अरिहंत कोल्ड स्टोरेज'वर अचानक धाड टाकून तब्बल 3,95,62,320 रुपये किमतीचा 75,356.8 किग्रॅ संशयास्पद लोण्याचा (Butter) साठा जप्त करण्यात आला आहे.अन्न व औषध प्रशासनाचे आयुक्त मा. श्री. तुकाराम मुंडे यांच्या आदेशानुसार आणि नाशिक विभागाचे सह-आयुक्त श्री. मं. उ. माने यांच्या मार्गदर्शनाखाली 10 सप्टेंबर 2026 रोजी रात्री ही धाड टाकण्यात आली.कोल्ड स्टोरेजमध्ये ठेवलेले 'Pasteurized Cooking Butter (Unsalted) (Madurama Creamy Delight)' हे लोणी निकृष्ट दर्जाचे असल्याच्या संशयावरुन आणि लेबलिंगच्या नियमांचे उल्लंघन केल्यामुळे जप्त करण्यात आले आहे. प्राथमिक अंदाजानुसार हा साठा 'पतंजली फूड्स लि.' या कंपनीचा असल्याचे समोर येत असून, याबाबतचा पुढील सविस्तर तपास अन्न सुरक्षा अधिकारी श्री. प्र. प. पवार करत आहेत.जप्त केलेल्या साठ्यातून अन्नाचे नमुने घेऊन ते प्रयोगशाळेत विश्लेषणासाठी पाठवण्यात आले आहेत. प्रयोगशाळेचा अहवाल प्राप्त होताच संबंधित दोषींवर कडक कायदेशीर कारवाई केली जाईल, अशी माहिती प्रशासनाने दिली आहे.कारवाईत सहभागी पथक श्री. गौ. वि. जगताप (सहायक आयुक्त - अन्न, नगर) श्री. प्रदिप प. पवार (अन्न सुरक्षा अधिकारी)श्री. कि. ध. जगदाळे (अन्न सुरक्षा अधिकारी)श्री. प्र. च. कसबेकर (नमुना सहायक) प्रशासनाचा व्यापाऱ्यांना कडक इशारा व नागरिकांना आवाहन:1. व्यापाऱ्यांसाठी सूचना: सणासुदीच्या दिवसांत कोणत्याही प्रकारे निकृष्ट, अस्वच्छ किंवा भेदसळयुक्त अन्नपदार्थांची साठवणूक व विक्री करु नये. तसेच, इतर राज्यांतून ट्रॅव्हल्स किंवा इतर वाहनांद्वारे अस्वच्छ पद्धतीने अन्नपदार्थ मागवू नयेत. नियमांचे उल्लंघन आढळल्यास संबंधित ट्रॅव्हल्स एजन्सीवरही कडक कारवाई केली जाईल.2. नागरिकांना आवाहन: नगर जिल्ह्यात अन्नपदार्थांमध्ये भेसळ होत असल्याचा संशय किंवा तक्रार असल्यास नागरिकांनी त्वरित अन्न व औषध प्रशासन कार्यालयाशी संपर्क साधावा, असे आवाहन सहायक आयुक्त (अन्न) श्री. गौ. वि. जगताप यांनी केले आहे.

# तक्रारींचा पाऊस, तरीही कचऱ्याचे साम्राज्य कायम! सरोष बाग–झेंडीगेट परिसर मनपाच्या दुर्लक्षाचा बळी

नगर : शहर स्वच्छ आणि सुंदर करण्यासाठी अहिल्यानगर महानगर पालिकेकडून विविध स्वच्छता मोहिमा, जनजागृती उपक्रम आणि स्वच्छतेचे दावे केले जात असताना, शहरातील काही भागांची परिस्थिती मात्र या दाव्यांना छेद देणारी आहे. सरोष बाग, झेंडीगेट आणि झेंडीगेट पोलीस चौकी शेजारील परिसरात मोठ्या प्रमाणावर कचरा, बांधकामाचा राडारोडा आणि अस्वच्छता साचलेली असतानाही प्रशासनाकडून अपेक्षित स्वच्छता मोहीम राबविली जात नसल्याचे चित्र समोर आले आहे.

या परिसरातील अस्वच्छतेची स्थिती दर्शविणारे छायाचित्रे सध्या नागरिकांच्या संतापाचे कारण ठरत आहेत. रस्त्यालगत मोठ्या प्रमाणात प्लास्टिक, खाद्यपदार्थांचे रॅपर, इतर कचरा तसेच बांधकामाचा राडारोडा पडलेला दिसत आहे. काही ठिकाणी मोठ्या आकाराचे पाईप व इतर टाकाऊ साहित्यही पडून आहे. त्यामुळे हा परिसर स्वच्छतेऐवजी कचरा टाकण्याचे ठिकाण बनला आहे की काय, असा सवाल नागरिकांकडून उपस्थित केला जात आहे.विशेष म्हणजे, हा प्रश्न अचानक निर्माण झालेला नसून या परिसराच्या स्वच्छतेबाबत संबंधित यंत्रणांकडे अनेक वेळा तक्रारी करण्यात आल्याचा दावा करण्यात आला आहे. घनकचरा विभाग, उद्यान विभाग तसेच महानगरपालिकेचे आयुक्त, उपायुक्त आणि पालकमंत्री यांच्याकडेही याबाबत तक्रारी करण्यात आल्या आहेत. मात्र, वारंवार तक्रारी करूनही प्रत्यक्ष ठिकाणी ठोस आणि



कायमस्वरुपी स्वच्छता मोहीम राबविली जात नसेल, तर नागरिकांनी दाद मागायची तरी कोणाकडे? असा संतप्त सवाल आता उपस्थित होत आहे.

पोलीस चौकीच्या शेजारीच अस्वच्छतेचा विळखाझेंडीगेट पोलीस चौकीच्या शेजारील परिसरातच अशी अवस्था असणे ही बाब विशेष चिंताजनक आहे. पोलिस चौकी, रहदारीचा परिसर आणि नागरिकांची सतत वर्दळ असलेल्या भागात जर कचरा आणि राडारोडा दीर्घकाळ पडून राहत असेल, तर शहरातील इतर भागांची स्वच्छता व्यवस्था कशी असेल, असा प्रश्न निर्माण होतो.छायाचित्रांमध्ये दिसणाऱ्या परिस्थितीनुसार, काही ठिकाणी रस्त्याच्या कडेला कचऱ्याचे ढीग निर्माण झाले आहेत. परिसरातील मोकळ्या जागेतही प्लास्टिक व अन्य कचरा विखुरलेला दिसतो. त्यामुळे केवळ एकदा कचरा उचलून प्रश्न सुटणार नाही. कचरा कुठून येतो, तो येथे कोण टाकतो आणि नियमित स्वच्छता का होत नाही, याची प्रशासनाने चौकशी करून कायमस्वरूपी उपाययोजना करण्याची गरज आहे.स्वच्छतेच्या जाहिराती नव्हे, प्रत्यक्ष कारवाई हवी

महानगर पालिकेकडून शहर स्वच्छ ठेवण्याचे आवाहन सातत्याने केले जाते. नागरिकांनी कचरा रस्त्यावर टाकू नये, ओला-सुका कचरा वेगळा करावा, सार्वजनिक ठिकाणी स्वच्छता राखावी, असे प्रशासन सांगते. हे आवाहन योग्यच आहे. मात्र, नागरिकांनी जबाबदारी पार पाडण्याबरोबरच महापालिकेच्या संबंधित विभागांनीही आपली जबाबदारी तितक्याच गांभीर्याने पार पाडणे आवश्यक आहे.नागरिकांनी तक्रारी करूनही जर त्या ठिकाणी स्वच्छता होत नसेल, तर तक्रार निवारण यंत्रणा नेमकी कशासाठी आहे? तक्रारींची नोंद होते, संबंधित विभागाकडे पाठविल्या जातात; पण त्यानंतर प्रत्यक्ष पाहणी, कचरा उचलणे, राडारोडा हटविणे आणि नियमित देखरेख याबाबत काय कार्यवाही होते, याचा जाब प्रशासनाने नागरिकांना देणे गरजेचे आहे.तातडीने विशेष स्वच्छता मोहीम राबविण्याची मागणी सरोष बाग–

झेंडीगेट परिसरात महापालिकेने तातडीने विशेष स्वच्छता मोहीम राबवावी, अशी मागणी होत आहे. या मोहिमेत केवळ साचलेला कचरा उचलणे पुरेसे नसून बांधकामाचा राडारोडा हटविणे, मोकळ्या जागेची साफसफाई करणे, झुडपे व वाढलेले गवत नियंत्रित करणे, कचरा पुन्हा टाकला जाणार नाही यासाठी उपाययोजना करणे आणि नियमित स्वच्छता कर्मचारी नियुक्त करणे आवश्यक आहे.तसेच या परिसरात कचरा टाकणाऱ्यांवर दंडात्मक कारवाई करण्यासाठी महापालिकेने पाहणी करावी. आवश्यक असल्यास संबंधित ठिकाणी सीसीटीव्ही कॅमेरे, सूचना फलक आणि दंडाची माहिती लावावी, अशी मागणीही नागरिकांकडून होऊ शकते.आता तरी प्रशासन खडबडून जागे होणार का?

एकीकडे शहराच्या सुशोभीकरणासाठी आणि स्वच्छतेसाठी मोठ्या प्रमाणावर प्रयत्न होत असल्याचे सांगितले जाते; तर दुसरीकडे शहराच्या मध्यवर्ती आणि वर्दळीच्या भागात अशी अस्वच्छता दिसत असेल तर या दोन्ही चित्रांमध्ये मोठी विसंगती आहे.तक्रारी करूनही प्रश्न सुटत नसेल, तर नागरिकांनी आणखी किती वेळ प्रतीक्षा करायची? असा सवाल आता उपस्थित होत आहे. सरोष बाग, झेंडीगेट आणि झेंडीगेट पोलीस चौकी परिसरातील परिस्थितीची महापालिका आयुक्त, उपायुक्त तसेच संबंधित घनकचरा व उद्यान विभागाच्या वरिष्ठ अधिकाऱ्यांनी स्वतः पाहणी करावी आणि तातडीने कार्यवाहीचे आदेश द्यावेत, अशी अपेक्षा आहे. छायाचित्रांमधून समोर आलेली परिस्थिती ही केवळ कचऱ्याची समस्या नाही; ती महानगरपालिकेच्या तक्रार निवारण आणि नियमित देखरेख व्यवस्थेचीही परीक्षा आहे. त्यामुळे आता कागदोपत्री आदेश किंवा आश्वासनांपेक्षा प्रत्यक्ष घटनास्थळी स्वच्छता करून दाखविण्याची वेळ आली आहे.

# जलसंपदा विभागाने शेतीच्या पाणी आवर्तनाचे योग्य नियोजन करावे – पालकमंत्री डॉ राधाकृष्ण विखे पाटील

शिर्डी , (उमाका) शेतकऱ्यांना योग्य वेळेत पाणी मिळेल यासाठी जलसंपदा विभागाने पाण्याचे योग्य नियोजन करून आवर्तनाचे वेळापत्रक तयार करण्याचे निर्देश जलसंपदा विभागाच्या अधिकाऱ्यांना दिले. भविष्यात पाण्याची समस्या उद्भवू नये यासाठी पाण्याचा काटकसरीने वापर करण्याचे आवाहन राज्याचे जलसंपदा मंत्री तथा जिल्ह्याचे पालकमंत्री डॉ. राधाकृष्ण विखे पाटील यांनी शेतकरी बांधवांना केले.

प्रवरा आणि गोदावरी लाभक्षेत्रातील पाण्याची सद्यस्थिती, शेतकऱ्यांच्या पाण्याच्या मागण्या आणि सिंचन नियोजनाबाबत जलसंपदामंत्री डॉ. राधाकृष्ण विखे पाटील यांच्या अध्यक्षतेखाली लोणी येथील पद्मश्री विखे पाटील महाविद्यालय सभागृहात समन्वय बैठकीचे आयोजन करण्यात आले. धरणे भरलेली असली तरी पाऊस लांबल्यामुळे निर्माण झालेल्या पाणी आव्हानांवर या बैठकीत सविस्तर चर्चा करण्यात आली.

या बैठकीस खासदार भाऊसाहेब वाकचौरे, माजी मंत्री अण्णासाहेब म्हस्के पाटील, आमदार अमोल खताळ, जलसंपदा विभागाचे अभियंता गोवर्धने, कार्यकारी अभियंता सोनाली शहाणे, स्वप्नील काळे, सायली पाटील यांच्यासह विविध राजकीय प्रतिनिधी म्हणून नितीन दिनकर,कपिल पवार, डॉ. भास्करराव खर्डे, शिवाजीराव जोंधळे, कैलास तांबे, आबासाहेब थोरात, गणेश कारखान्याचे माजी चेअरमन मुकुंदराव सदाफळ, बापूसाहेब देशमुख, यांची उपस्थिती होती

भंडारदरा, निळवंडे आणि गोदावरी धरणांमधून उपलब्ध पाण्यावर आवर्तनाचे काटेकोर नियोजन करण्याचे निर्देश त्यांनी संबंधित विभागाच्या अधिकाऱ्यांना दिले.

तसेच नदीपात्रातून होत असलेल्या बेकायदेशीर वाळू उपशाबाबत मंत्री विखे पाटील यांनी जलसंपदा विभागाच्या अधिकाऱ्यांना खबरदारी घेण्याचे निर्देश दिले. जलसंपदा विभागाचे 'ना हरकत प्रमाणपत्र' आवश्यक असून नियमांचा कठोर आधार घेऊन तातडीने कडक कारवाई करण्याचे आदेश त्यांनी दिले.

*शेतकऱ्यांचे वीज प्रश्न व इतर मागण्या*

बैठकीत शेतकऱ्यांनी विजेच्या गंभीर समस्येकडे लक्ष वेधले. यावर प्रतिक्रिया देताना मंत्री विखे पाटील यांनी वीज वितरण कंपनीच्या अधिकाऱ्यांची स्वतंत्र बैठक घेऊन भारनियमनाच्या समस्येवर तातडीने मार्ग काढण्याचे व शेतकऱ्यांना दिलासा देण्याचे आश्वासन दिले. तसेच, आमदार अमोल खताळ यांनी भोजापूर पूरचारीचा नदीजोड प्रकल्पात समावेश केल्याबद्दल आणि साकूर उपसा सिंचन योजनेला मंजुरी मिळाल्याबद्दल मंत्र्यांचे आभार लवकरात लवकर पाण्याचे आवर्तन सोडण्याची मागणी केली.

# 'लोणी बु. ग्रामपंचायतीला संत गाडगेबाबा ग्राम स्वच्छता अभियानात प्रथम पुरस्कार

शिर्डी, (उमाका) : संत गाडगेबाबा ग्राम स्वच्छता अभियानात विभागीय पातळीवरील प्रथम पुरस्कार ग्रामपंचायत लोणी बु.ता. राहता, जि. अहिल्यानगर यांना जाहीर झाला आहे. विभागीय आयुक्त कार्यालय, नाशिक येथील विकास योजना शाखा यांच्यातर्फे सन २०२५-२६ अंतर्गत विभागस्तरावर राबविण्यात आलेल्या संत गाडगेबाबा ग्राम स्वच्छता अभियानांतर्गत 'राष्ट्र संत तुकडोजी महाराज स्वच्छ ग्राम स्पर्धेचे' निकाल जाहीर करण्यात आले आहेत. जिल्हास्तरावर प्रथम व द्वितीय क्रमांक प्राप्त ग्रामपंचायतींच्या तपासणीनंतर नाशिक विभागातील विजेत्या ग्रामपंचायतींची नावे घोषित करण्यात आली आहेत.श्रीमती शालिनीताई विखे पाटील यांच्या मार्गदर्शनाखाली लोणी बु. ग्रामपंचायतीने शासनाच्या विविध योजनांची प्रभावी अंमलबजावणी केल्याबद्दल ग्रामपंचायतीला विभाग स्तरावरील प्रथम पुरस्कार मिळाला आहे.नाशिक विभागात द्वितीय पुरस्कार ,ग्रामपंचायत वाठोडे, ता. शिरपूर, जि. धुळे आणि तृतीय पुरस्कार ग्रामपंचायत भोकणी, ता. सिन्नर, जि. नाशिक यांना जाहीर झाले आहेत.अप्पर आयुक्त (विकास) तथा प्राधिकृत अधिकारी, विभागीय आयुक्त कार्यालय, नाशिक कार्यालयाने हे पुरस्कार जाहीर केले असून पुरस्कार प्राप्त ग्रामपंचायतींचे सर्वत्र अभिनंदन होत आहे.

## राष्ट्रीय लोकअदालतमध्ये ४९४१९ इतकी प्रकरणे निकाली आणि ४९ कोटी रुपयांची तडजोड

मा. राष्ट्रीय विधी सेवा प्राधिकरण, नवी दिल्ली, मा. राज्य विधी सेवा प्राधिकरण, मुंबई यांच्या निर्देशा नुसार जिल्हा विधी सेवा प्राधिकरण, अहमदनगर तर्फे मा. प्रमुख जिल्हा व सत्र न्यायाधीश श्री. शिवाजी भ. कचरे साहेब यांचे मार्गदर्शनाखाली व जिल्हा न्यायाधीश-1व अतिरिक्त सत्र न्यायाधीश श्री. राजेश एस. गुप्ता यांच्या उपस्थितीत शनिवार दि. 12/09/2026 रोजी राष्ट्रीय लोकअदालतीचे आयोजन जिल्हा न्यायालय, अहमदनगर तसेच सर्व तालुका न्यायालयांमध्ये करण्यात आले होते.राष्ट्रीय लोकअदालतमध्ये अहमदनगर जिल्हयामध्ये सर्व न्यायालयांतील दिवाणी व फौजदारी प्रकरणे, धनादेश / चेक संदर्भातील प्रकरणे, बँकेची कर्ज वसूली प्रकरणे, मोटार वाहन अपघात नुकसान भरपाई प्रकरणे, कामगार न्यायालयांतील प्रकरणे, कौटुंबिक वादाची प्रकरणे, वीज महावितरणाची समझोता योग्य प्रकरणे तसेच न्यायालयात येण्या अगोदरची दाखलपूर्व प्रकरणे आपसी समझोत्या करीता ठेवण्यात आली होती. अहमदनगर जिल्हयामध्ये 47,179 दाखलपूर्व प्रकरणे मिटविण्यात आली. तर 2,240 प्रलंबित प्रकरणांचा निपटारा करण्यात आला, विशेष मोहिमेमध्ये 1,347 प्रकरणे निकाली काढण्यात आली. सदर लोकअदालतीध्ये साधरणतः 49 कोटी रुपयांची तडजोड झाली आहे. सदरचे लोकन्यायालय यशस्वी करण्यासाठी अहमदनगर जिल्ह्यातील सर्व न्यायाधीश, जिल्ह्यातील सर्व वकील संघटना, जिल्हाधिकारी कार्यालय, जिल्हा परिषद कार्यालय, जिल्हा पोलीस कार्यालय यांचे महत्वाचे सहकार्य लाभले. तसेच जिल्ह्यातील सर्व न्यायालयीन कर्मचारी, जिल्हा विधी सेवा प्राधिकरणाचे कर्मचारी यांचे योगदान लाभले अशी माहिती जिल्हा विधी सेवा प्राधिकरणाचे सचिव, श्री. योगेश सु. पैठणकर यांनी दिली.

## अभंग, गवळण, भारुड, नृत्या चा रंगला अनोखा संगम सावेडी जेष्ठ नागरिक मंचच्या वतीने आयोजित 'नैवेद्य समर्पण'




**नगर :** ओम संगीत विद्यालया तर्फे नमोजी आद्या, देव देव्हार्यात नाही, क्षणभर उघडी नयन देवा, अबिर गुलाल, निजरूप दाखवावे, माता आई तुळजा आई, जेजुरीचा खंडोबा या संगीत नृत्यमय कार्यक्रमाचा रंगला अनोखा संगम. निमित्त होते सावेडी ज्येष्ठ नागरिक मंचच्या वतीने आयोजित 'नैवेद्य समर्पण' या संगीत नृत्यमय कार्यक्रमाचा. ज्येष्ठ नागरिक मंच सावेडी च्या सभागृहात रंगलेल्या या संगीत मैफिलीत ओम संगीत विद्यालयाचे श्री रवींद्र उल्हारे,अनंत द्रविड व सह कलाकारांनी विविध अभंग, गौळण, भारुड गीते सादर केली. यावेळी मंचचे अध्यक्ष शरद कुलकर्णी, बलभीम पांडव, न्यायाधीश चारु डोंगरे, एस आर जोशी, श्रीकांत नाईक, सुनंदा कुलकर्णी, कुमुदिनी बोपर्डीकर, केळकर ताई, खणकर सर, बाजीराव जाधव,स्नेहल वेलणकर मोरेश्वर मुळे, शुभदा जागीरदार चारुशीला करवंदे, ज्योती केसकर उपस्थित होते. गणेश पूजनाने मैफिलीचा प्रारंभ झाला. दुसऱ्या सत्रात 'तराना' या गायन प्रकारावर अनंत द्रविड यांनी मनमोहक असे नृत्य सादर केले. त्यानंतर जात्याच्या ओव्या, दादला नको ग बाई, हे भारुड सादर केले गेले. त्यांना साथ संगत करणारे दिलीप काकडे, धनाजी पांचाळ विशाल आढागळे, तसेच सिंथेसायझर वर होते शलमुन पहिलवान यांनी केले. मयूर नृत्य करणारे द्रविड सर यांनी झाडे लावा झाडे जगवा, साक्षरता, राष्ट्रप्रेम, स्वच्छता, स्वालंबन, नात्यांमधील घट्ट वीण, आई-वडिलांचे महत्त्व यावर प्रबोधन केले.'चुकले तुझे बाळ आई' या भैरवीने कार्यक्रमाची सांगता झाली. सर्व कलाकारांचा यथोचित सत्कार अध्यक्ष शरद कुलकर्णी यांनी केला. कलाकारांचा परिचय पुष्पा चितांबर, कार्यक्रमाचे सूत्रसंचलन हरिश्चंद्र थिगळे यांनी केले तर आभार पुष्पाताई कोरे यांनी मानले.

## ब्रिक्स शिखर परिषदेच्या समारोप सत्रात

**(पान 1 वरुन) जो विविध देशांचे दृष्टिकोन आणि राष्ट्रीय हितसंबंधांचा आदर करतो.या जाहीरनाम्यात एकतर्फी शुल्क आणि गैर-शुल्क उपायांबद्दल गंभीर चिंता व्यक्त करण्यात आली. ब्रिक्सने म्हटले आहे की असे उपाय व्यापारात विकृती निर्माण करतात आणि डब्ल्यूटीओच्या नियमांशी विसंगत आहेत.ब्रिक्स देशांनी अणुबॉम्बच्या धोक्याबद्दल आणि अणुसंघर्षाच्या वाढत्या जोखमीबद्दल गंभीर चिंता व्यक्त केली.सदस्य देशांनी सीमापार पेमेंट सुलभ करण्यासाठी संवाद सुरु ठेवण्यास आणि व्यावहारिक उपाय शोधण्यास सहमती दर्शवली.ब्रिक्सने आंतरराष्ट्रीय कायद्याच्या विरोधात मानल्या जाणाऱ्या एकतर्फी सक्तीच्या आर्थिक आणि इतर उपाययोजनांचा निषेध केला.ब्रिक्स देशांनी इतर कोणते ठराव केले?दिल्ली जाहीरनाम्यात, ब्रिक्स देशांनी युद्ध आणि संघर्ष टाळण्याच्या प्रयत्नांवर भर दिला आणि विवादांच्या मूळ कारणांवर लक्ष देणे आवश्यक असल्याचे म्हटले. सदस्य देशांनी संवाद, सल्लामसलत आणि मुत्सद्देगिरीद्वारे आंतरराष्ट्रीय विवादांच्या शांततापूर्ण निराकरणासाठी आपली वचनबद्धता पुन्हा व्यक्त केली. त्यांनी जागतिक समस्यांसाठी बहुपक्षीय दृष्टिकोनाचे आवाहन केले, जो प्रत्येक देशाच्या राष्ट्रीय दृष्टिकोनांचा आणि भूमिकांचा आदर करतो. या जाहीरनाम्यात एकतर्फी शुल्क आणि अशुल्कीय उपाययोजनांच्या वाढत्या वापरावर गंभीर चिंता व्यक्त करण्यात आली. ब्रिक्स देशांनी म्हटले की अशा उपाययोजनांचा जागतिक व्यापारावर परिणाम होतो आणि त्या डब्ल्यूटीओच्या नियमांशी विसंगत आहेत. अणुबॉम्बच्या धमक्या आणि अणुबॉम्ब संघर्षाच्या वाढत्या धोक्याबद्दल चिंता व्यक्त करण्यात आली.ब्रिक्स देशांनी सीमापार देयके सुलभ करण्यासाठी संवाद सुरु ठेवण्याची आणि व्यावहारिक उपाय शोधण्याची गरज असल्याचे सांगितले आहे. त्यांनी आंतरराष्ट्रीय कायद्याचे उल्लंघन करणाऱ्या एकतर्फी सक्तीच्या उपाययोजनांचाही निषेध केला. जागतिक व्यापार, पुरवठा साखळी आणि ऊर्जेचा सुरळीत प्रवाह कायम राखण्यासाठी ब्रिक्स देशांनी एकत्र काम करण्याच्या गरजेवरही संयुक्त घोषणेत भर देण्यात आला.**

साप्ताहिक दर्शक
हे पत्रक मालक,मुद्रक,प्रकाशक,संस्थापक संपादक शेख रियाज फजलोद्दीन यांनी दर्शक भवन,726,दिपाली थिएटर समोर,झेंडीगेट रोड,अहिल्यानगर-414001 येथे मुद्रीत करुन येथेच प्रकाशित केले संपादक-शेख रियाज फजलोद्दीन मो.9763030386, कार्य.संपादक-शेख आदिल रियाज मो-7666602660, मुख्य कार्यालय -दर्शक भवन,झेंडीगेट पोलीस चौकी समोर,अहिल्यानगर-414001 महाराष्ट्र इ-मेल- weeklydarshak@gmail.com (पीआरबी कायद्यानुसार संपादकीय जबाबदारी यांच्यावर वादविवाद अहिल्यानगर न्यायकक्षेत) email-darshaknews81@gmail.com

# पात्र मतदाराचे नाव चुकीने वगळले जाणार नाही याची दक्षता घ्या; दावे-हरकतींची छानानी करा–विभागीय आयुक्त डॉ.प्रवीण गेडाम

## मतदार यादी अधिक अचूक, पारदर्शक व नागरिकस्नेही करण्यावर भर

नगर, दि. 11 सप्टेंबर (जिमाका वृत्तसेवा) :मतदार यादी सखोल पुनरीक्षणाची प्रक्रिया अधिक गतिमान करताना प्रत्येक मतदाराची नोंद अचूकपणे तपासून मतदार यादी अद्ययावत, पारदर्शक व विश्वासार्ह करण्याला सर्वोच्च प्राधान्य द्यावे. पात्र मतदाराचे नाव कोणत्याही परिस्थितीत चुकीने वगळले जाणार नाही, याची विशेष दक्षता घ्यावी. प्राप्त दावे व हरकतींची नियमानुसार वस्तुनिष्ठ व काटेकोर छाननी करून संपूर्ण प्रक्रिया निष्पक्ष आणि नागरिकाभिमुख पद्धतीने पूर्ण करावी, असे निर्देश विभागीय आयुक्त तथा मतदार यादी निरीक्षक डॉ. प्रवीण गेडाम यांनी आज दिले.

जिल्हाधिकारी कार्यालयात विभागीय आयुक्त तथा मतदार यादी निरीक्षक डॉ. प्रवीण गेडाम यांच्या अध्यक्षतेखाली मतदार यादी पुनरीक्षणाचा आढावा तसेच सर्व राजकीय पक्षांच्या पदाधिकारी व प्रतिनिधींची बैठक आयोजित करण्यात आली होती. यावेळी ते बोलत होते. बैठकीस जिल्हाधिकारी डॉ. पंकज आशिया, उपजिल्हा निवडणूक अधिकारी सुनील गाडे, विविध राजकीय पक्षांचे जिल्हाध्यक्ष, शहराध्यक्ष, पदाधिकारी व प्रतिनिधी तसेच संबंधित मतदारसंघांचे निवडणूक निर्णय अधिकारी उपस्थित होते.

दावे व हरकतींवर पारदर्शक निर्णय घ्या -विभागीय आयुक्त डॉ. गेडाम म्हणाले, मतदार यादी पुनरीक्षणाच्या कामात प्रत्यक्ष क्षेत्रीय पातळीवर कार्यरत असलेल्या बीएलओंची भूमिका अत्यंत महत्त्वाची आहे. त्यामुळे बीएलओंकडून सुरु असलेल्या कामाचा नियमित आढावा घेऊन त्यांना आवश्यक मार्गदर्शन व




सूचना द्याव्यात. प्रत्येक मतदाराची नोंद काळजीपूर्वक तपासताना संबंधित कागदपत्रे, उपलब्ध माहिती आणि प्रत्यक्ष पडताळणी यांचा योग्य समन्वय साधावा.

मतदार यादीत एकाच व्यक्तीची एकापेक्षा अधिक ठिकाणी नोंद असणे, मतदाराचे स्थलांतर होणे, मृत्यू झालेला असणे किंवा अन्य कारणांमुळे नोंदीमध्ये बदल आवश्यक असल्यास तसेच प्राप्त होणा-या दावे व हरकतींची योग्य पध्दतीने तपासणी करुन अंतिम निर्णय घ्यावा.

मतदारांच्या सुविधेला प्राधान्य

आगामी काळात मतदान केंद्रांची रचना करताना मतदारांना कोणत्याही प्रकारची अडचण निर्माण होणार नाही, याची विशेष काळजी घ्यावी. मतदान केंद्राचे स्थान, मतदारांची संख्या, प्रवेशाची सुलभता तसेच उपलब्ध मूलभूत सुविधा यांचा विचार करून मतदारस्नेही मतदान केंद्रांची रचना करावी. विशेषतः ज्येष्ठ नागरिक, दिव्यांग मतदार आणि इतर गरजू मतदारांना मतदान करताना आवश्यक सुविधा उपलब्ध होतील, याकडेही लक्ष द्यावे, असे डॉ. गेडाम यांनी सांगितले.

*नागरिकांनीही मतदार यादी तपासावी*

मतदार यादीतील आपले नाव, पत्ता, वय तसेच अन्य तपशील अचूक आहेत का, याची नागरिकांनी स्वतःही खात्री करावी. नोंदीमध्ये काही त्रुटी असल्यास संबंधित निवडणूक कार्यालयाशी संपर्क साधून नियमानुसार दुरुस्तीची कार्यवाही करून घ्यावी. मतदार यादी अद्ययावत करण्याची प्रक्रिया ही निरंतर स्वरुपाची असल्याने पात्र नागरिकांना नोंदणी, दुरुस्ती अथवा आवश्यक बदल करण्याची संधी उपलब्ध आहे.मतदार यादी ही लोकशाही व्यवस्थेचा अत्यंत महत्त्वाचा आधार आहे. त्यामुळे प्रत्येक पात्र नागरिकाचा हक्क सुरक्षित राहील आणि प्रत्येक नोंद अचूक राहील, यासाठी प्रशासन, राजकीय पक्ष आणि नागरिकांनी समन्वयाने काम करणे आवश्यक आहे, असे आवाहनही विभागीय आयुक्त डॉ. प्रवीण गेडाम यांनी केले.

पुनरीक्षण कार्यक्रमाच्या प्रगतीचा आढावायावेळी उपजिल्हा निवडणूक अधिकारी सुनील गाडे यांनी सादरीकरणाद्वारे जिल्ह्यातील मतदार यादी सखोल पुनरीक्षण कार्यक्रमाची सद्यस्थिती, प्राप्त अर्ज, नोंदींची पडताळणी आणि आतापर्यंत झालेल्या कार्यवाहीची माहिती दिली. बैठकीत उपस्थित विविध राजकीय पक्षांच्या पदाधिकारी व प्रतिनिधींनी मतदार यादी अधिक अचूक व पारदर्शक करण्याच्या दृष्टीने मौलिक सूचना मांडल्या. प्रशासनाने या सूचनांची नोंद घेत आवश्यक कार्यवाही करण्याचे आश्वासन दिले.

# शिष्यवृत्ती परीक्षेत रेसिडेन्शिअल हायस्कूल जिल्ह्यात अव्वल!

नगर : मेहनत, जिद्द आणि योग्य मार्गदर्शनाच्या बळावर रेसिडेन्शिअल हायस्कूलने शिष्यवृत्ती परीक्षेत जिल्ह्यात अव्वल कामगिरी करत शाळेच्या शैक्षणिक गुणवत्तेची उज्ज्वल परंपरा कायम राखली आहे. इयत्ता पाचवी, सातवी व आठवीतील तब्बल 72 विद्यार्थी शिष्यवृत्तीस पात्र ठरले असून, या गुणवंत विद्यार्थ्यांचा सन्मान सोहळा उत्साहपूर्ण वातावरणात पार पडला. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी संस्थेचे ज्येष्ठ विश्वस्त श्री. जी. डी. खानदेशे होते. कार्यक्रमाच्या प्रारंभी प्राचार्य श्री. जाधव व्ही. व्ही. यांनी उपस्थित मान्यवरांचे स्वागत करून कार्यक्रमाचे प्रास्ताविक केले. त्यांनी विद्यार्थ्यांच्या यशामागील मेहनत, शिक्षकांचे मार्गदर्शन, पालकांचे सहकार्य आणि संस्थेचे प्रोत्साहन यांचा गौरवपूर्ण उल्लेख केला. यावेळी मार्गदर्शन करताना श्री. जी. डी. खानदेशे यांनी, “शिष्यवृत्ती परीक्षा विद्यार्थ्यांच्या उज्ज्वल भवितव्याचा भक्कम पाया आहे,” असे प्रतिपादन केले. विद्यार्थ्यांनी लहान वयापासूनच स्पर्धा परीक्षांची तयारी करून सातत्य, मेहनत आणि अभ्यासाचे योग्य नियोजन अंगीकारावे, असे आवाहन त्यांनी केले. संस्थेचे अध्यक्ष श्री. रा. ह. दरे यांनी स्पर्धा परीक्षांचे महत्त्व विशद करत विद्यार्थ्यांना भविष्यातील विविध स्पर्धात्मक परीक्षांसाठी सज्ज राहण्याचे आवाहन केले. संस्थेचे सचिव ॲड. विश्वासराव आठरे पाटील यांनी शिष्यवृत्ती परीक्षेत यशस्वी ठरलेल्या विद्यार्थ्यांसह त्यांना मार्गदर्शन करणाऱ्या शिक्षकांचे अभिनंदन करून शुभेच्छा दिल्या.

संस्थेचे ज्येष्ठ विश्वस्त श्री. सीताराम पाटील खिलारी यांनीही विद्यार्थ्यांना मार्गदर्शन करताना स्पर्धा परीक्षांचे जीवनातील महत्त्व स्पष्ट केले. मेहनत, सातत्य आणि योग्य मार्गदर्शनाच्या जोरावर विद्यार्थ्यांनी मोठी स्वप्ने पाहून ती साकार करावीत, असे त्यांनी सांगितले. संस्थेचे सहसचिव श्री मुकेश दादा मुळे तसेच संस्थेच्या खजिनदार दीप लक्ष्मी म्हसे मॅडम, विश्वस्त श्री जयंत वाघ साहेब या प्रसंगी उपस्थित होते.

यावेळी मान्यवरांच्या हस्ते 72 गुणवंत विद्यार्थ्यांचा सन्मान करण्यात आला. सत्कारानंतर विद्यार्थ्यांनी आपल्या मनोगतातून शाळेने आणि शिक्षकांनी स्पर्धा परीक्षेच्या तयारीसाठी दिलेल्या बहुमोल मार्गदर्शनाबद्दल कृतज्ञता व्यक्त केली. तसेच भविष्यातही मेहनत व सातत्याच्या जोरावर उत्तुंग यश मिळविण्याचा निर्धार व्यक्त केला.कार्यक्रमास शाळेचे उपमुख्याध्यापक श्री. पवार बी. एम., पर्यवेक्षक श्री. म्हस्के डी. सी. सर, श्री. सोनवणे एस. जी. सर तसेच सौ. मरकड व्ही. के. मॅडम यांची प्रमुख उपस्थिती होती. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन श्रीमती दरे एस. बी. व श्री. गावडे आर. आर. यांनी प्रभावीपणे केले, तर आभार प्रदर्शन श्री. सोनवणे एस. जी. यांनी केले.72 विद्यार्थ्यांचे हे यश म्हणजे विद्यार्थ्यांची मेहनत, शिक्षकांचे मार्गदर्शन आणि संस्थेच्या शैक्षणिक कार्याला मिळालेली यशाची पावती आहे. या दैदिप्यमान कामगिरीमुळे रेसिडेन्शिअल हायस्कूलच्या शैक्षणिक शिरपेचात आणखी एक मानाचा तुरा रोवला गेला आहे.

# आधार आपुलकी फाउंडेशनचा पर्यावरणपूरक व सामाजिक भान जपणारा सात दिवसांचा गणेशोत्सव

नगर : आधार आपुलकी फाउंडेशन, अहिल्यानगरच्या वतीने दरवर्षीप्रमाणे यंदाही सामाजिक भान जपत पर्यावरणपूरक गणेशोत्सवाचे आयोजन करण्यात आले आहे. गणेशोत्सवाची सुरुवात पर्यावरणपूरक गणेशमूर्ती कार्यशाळेने करण्यात आली असून, या उपक्रमाला नागरिकांचा उत्स्फूर्त प्रतिसाद मिळाला. दरम्यान, नुकत्याच झालेल्या सभेत गणेशोत्सव 2026 साठीच्या कार्यकारिणीची सर्वानुमते निवड करण्यात आली.यामध्ये अध्यक्षपदी श्रीमती प्रतिभा साबळे, उपाध्यक्षपदी सौ. नीलिमा तरवडे व सौ. रजनी ढोरजे, सचिवपदी श्री. एकनाथ राजळे, तर कोषाध्यक्षपदी श्रीकांत नाईक यांची निवड करण्यात आली. नवनिर्वाचित कार्यकारिणीच्या माध्यमातून यंदाचा गणेशोत्सव सामाजिक संदेश, पर्यावरण संवर्धन आणि ज्येष्ठ नागरिकांचा सक्रिय सहभाग या त्रिसूत्रीवर साजरा करण्याचा मानस व्यक्त करण्यात आला.आधार आपुलकी फाउंडेशनच्या गणेशोत्सवाचे वैशिष्ट्य म्हणजे अहिल्यानगर जिल्ह्यात ज्येष्ठ नागरिकांनी स्थापन केलेले हे एकमेव गणेश मंडळ असल्याचे संस्थेच्या वतीने सांगण्यात आले. त्यामुळे या गणेशोत्सवाला केवळ धार्मिक उत्सवाचे स्वरूप न राहता ज्येष्ठ नागरिकांच्या सामाजिक सहभागाचे एक महत्त्वाचे व्यासपीठ म्हणून विशेष स्थान प्राप्त झाले आहे. सात दिवसांचा हा गणेशोत्सव पर्यावरणपूरक पद्धतीने साजरा करताना अनावश्यक खर्चाला फाटा देऊन ‘ज्येष्ठांचा समाजहित प्रबोधनासाठी आनंदोत्सव’ ही संकल्पना केंद्रस्थानी ठेवण्यात आली आसुन रोज संध्याकाळी सात दिवस अहिल्यानगर मधील मान्यवरांच्या हस्ते आरती केली जाणार आहे. 2022 पासून कार्यरत असलेल्या आधार आपुलकी फाउंडेशनच्या माध्यमातून ज्येष्ठ नागरिकांसाठी विविध उपक्रम सातत्याने राबविले जात आहेत. दर महिन्याला नियोजनबद्ध पद्धतीने सांस्कृतिक, सामाजिक, धार्मिक तसेच मनोरंजनात्मक उपक्रमांचे आयोजन केले जाते. संवाद, नव्या गोष्टी शिकण्याची संधी, दर्जेदार सांस्कृतिक कार्यक्रम, सहली आणि धार्मिक पर्यटन अशा विविध उपक्रमांतून ज्येष्ठ नागरिकांना सक्रिय सामाजिक सहभागाची संधी मिळत आहे.

# पॉक्सो कायद्याची जनजागृती; बालकांच्या सुरक्षिततेसाठी ‘स्नेह बाल आधार’ची जिल्हाभर मोहीम

नगर : बालकांचे लैंगिक शोषण व अत्याचारापासून संरक्षण व्हावे, तसेच अशा घटनांमध्ये बालकांना तातडीने न्याय, सुरक्षा, आधार आणि विश्वास मिळावा, या उद्देशाने स्नेहालयच्या ‘स्नेह बाल आधार’ प्रकल्पाच्या वतीने अहिल्यानगर जिल्ह्यात व्यापक जनजागृती मोहीम राबविण्यात आली.या मोहिमेअंतर्गत पारनेर, श्रीरामपूर, संगमनेर, अकोले आणि शिर्डी परिसरातील विविध पोलीस ठाणे व संबंधित यंत्रणांशी संवाद साधून बालकांचे लैंगिक अपराधांपासून संरक्षण अधिनियम (POCSO Act) संदर्भात जनजागृती करण्यात आली. बालकांवरील लैंगिक अत्याचाराची घटना घडल्यास तक्रार नोंदविण्याची प्रक्रिया, बालकांशी संवेदनशील पद्धतीने संवाद, त्यांचे कायदेशीर हक्क तसेच उपलब्ध मदत व सेवांबाबत मार्गदर्शन करण्यात आले.



या मोहिमेत ‘स्नेह बाल आधार’ प्रकल्पाचे समन्वयक संतोष धर्माधिकारी, सपोर्ट पर्सन पूजा दहातोंडे व शाहीद शेख तसेच समुपदेशक सीमा माळी उपस्थित होते. टीमच्या माध्यमातून पोलीस अधिकारी व कर्मचाऱ्यांशी संवाद साधत पॉक्सो कायद्याची प्रभावी अंमलबजावणी, बालकांना आवश्यक आधार आणि प्रकरणांमध्ये विविध यंत्रणांमधील समन्वय याबाबत माहिती देण्यात आली.

यावेळी समन्वयक संतोष धर्माधिकारी म्हणाले, “बालकांवरील लैंगिक अत्याचाराची घटना घडल्यानंतर मदत करणे महत्त्वाचे आहेच; मात्र त्यापेक्षा महत्त्वाचे म्हणजे अत्याचाराची घटना घडू नये यासाठी समाजामध्ये जागरुकता निर्माण करणे. बालकाने व्यक्त केलेली भीती, अस्वस्थता किंवा एखादा अनुभव दुर्लक्षित न करता त्याचे म्हणणे संवेदनशीलतेने ऐकणे आवश्यक आहे. बालकांच्या सुरक्षिततेची जबाबदारी केवळ पोलीस किंवा प्रशासनाची नसून पालक, शिक्षक आणि समाजातील प्रत्येक व्यक्तीची आहे.”“एका बालकाचे बालपण सुरक्षित करणे म्हणजे त्याच्या संपूर्ण भविष्याला सुरक्षित दिशा देणे होय. त्यामुळे बालकांवरील अत्याचाराची माहिती मिळाल्यानंतर शांत न राहता योग्य वेळी आवाज उठवणे आणि बालकाच्या पाठीशी उभे राहणे ही प्रत्येक नागरिकाची सामाजिक जबाबदारी आहे,” असेही धर्माधिकारी यांनी सांगितले.स्नेह बाल आधारच्या माध्यमातून बालक, पालक, पोलीस, प्रशासन, शाळा आणि समाजातील विविध घटकांमध्ये समन्वय निर्माण करून बालकांना आवश्यक संरक्षण व मदत मिळवून देण्यासाठी सातत्याने प्रयत्न केले जात आहेत. पॉक्सो कायद्याबाबतची माहिती समाजाच्या शेवटच्या घटकापर्यंत पोहोचवून बालकांच्या सुरक्षिततेसाठी सक्षम वातावरण निर्माण करण्याचा या मोहिमेचा उद्देश आहे.बाल लैंगिक अत्याचाराची कोणतीही घटना आपल्या निदर्शनास आल्यास ती दडपून न ठेवता तत्काळ माहिती देण्याचे आवाहन करण्यात आले आहे. अशा घटना निदर्शनास आल्यास नागरिकांनी ‘स्नेह बाल आधार’च्या हेल्पलाइन क्रमांक 9011020175 वर संपर्क साधून माहिती देण्याचे तसेच आवश्यक मदत घेण्याचे आवाहन प्रकल्पाच्या वतीने करण्यात आले आहे.

“बालक सुरक्षित तरच समाज सुरक्षित — अत्याचार दिसला तर गप्प राहू नका, आवाज उठवा आणि बालकाच्या पाठीशी उभे राहा.”

# पुण्याच्या सर्वांगीण विकासासाठी पीएमआरडीएचा ‘मास्टर प्लॅन’ गतिमान करा – उपमुख्यमंत्री सुनेत्रा अजित पवार



मुंबई, दि. 10 :- पुणे जिल्ह्याच्या नियोजित व सर्वांगीण विकासामध्ये पुणे महानगर प्रदेश विकास प्राधिकरणाची (पीएमआरडीए) भूमिका अत्यंत महत्त्वाची असून, पीएमआरडीए क्षेत्रातील पायाभूत सुविधांची कामे अधिक वेगाने आणि नियोजनबद्ध पद्धतीने पूर्ण करावीत, असे निर्देश उपमुख्यमंत्री सुनेत्रा अजित पवार यांनी आज दिले.

सह्याद्री राज्य अतिथीगृह येथे पीएमआरडीए क्षेत्रातील विविध विकासकामांचा आढावा उपमुख्यमंत्री सुनेत्रा अजित पवार यांनी घेतला. यावेळी पीएमआरडीएच्या माध्यमातून सुरु असलेल्या तसेच प्रस्तावित विविध प्रकल्पांचा सविस्तर आढावा घेण्यात आला. या बैठकीस उपमुख्यमंत्र्यांचे सचिव डॉ. राजेश देशमुख, पुणे महानगर प्रदेश विकास प्राधिकरणाचे आयुक्त डॉ. अभिजित चौधरी, सह आयुक्त (प्रशासन) रुपाली आवले-डंबे, सह आयुक्त (जमीन व मालमत्ता) पूनम मेहता, प्रभारी सह आयुक्त (अनधिकृत बांधकाम) हिम्मत खराडे, महानगर नियोजनकार स्मिता कलकुटकी, मुख्य अभियंता, अभियांत्रिकी विशेष प्रकल्प रिनाज पठाण, प्रभारी मुख्य अभियंता शिवप्रसाद बागडी यांच्यासह पीएमआरडीएचे संबंधित विभागप्रमुख उपस्थित होते.उपमुख्यमंत्री सुनेत्रा अजित पवार म्हणाल्या, पीएमआरडीएच्या कार्यक्षेत्रात 674 गावांचा समावेश असून, सुमारे 5,215 चौरस किलोमीटर क्षेत्राचा समावेश आहे. पुणे महानगर प्रदेशाचा झपाट्याने होत असलेला विस्तार, वाढती लोकसंख्या, औद्योगिकीकरण, नागरीकरण आणि पर्यटनाच्या वाढत्या संधी लक्षात घेऊन पुढील अनेक वर्षांचा विचार करून पायाभूत सुविधांचे नियोजन करावे.इनर रिंग रोडसह वाहतूक व्यवस्था सक्षम करण्यावर भर

पुणे इनर रिंग रोड, सीएमपी कॉम्प्रेहेंसिव्ह मोबिलिटी प्लॅन अंतर्गत प्रस्तावित प्रकल्प, हिंगणगाव पूल, यवत रेल्वे ब्रिज आदी प्रकल्पांना आवश्यक ती गती देण्याच्या सूचना त्यांनी दिल्या. पुणे शहर आणि पीएमआरडीए क्षेत्रातील वाहतूक व्यवस्था अधिक सक्षम करण्यासाठी विविध भागांना जोडणारी प्रभावी कनेक्टिव्हिटी विकसित करणे आवश्यक असल्याचे त्यांनी सांगितले. मल्टिमोडल हब, औद्योगिक कनेक्टिव्हिटी, धार्मिक स्थळांची कनेक्टिव्हिटी, पर्यटन कनेक्टिव्हिटी तसेच विमानतळाशी जोडणी यांचा एकात्मिक विचार करून नियोजन करण्याच्या सूचनाही त्यांनी दिल्या.हिंजवडी परिसरातील वाहतूक कोंडी सोडवण्यासाठी मेट्रोला गतीपुण्यातील माण–हिंजवडी परिसरातील वाढती वाहतूक कोंडी लक्षात घेता माण–हिंजवडी–शिवाजीनगर पुणे मेट्रो लाईन-3चे काम तातडीने पूर्ण करण्यासाठी आवश्यक कार्यवाही करावी, असे निर्देश उपमुख्यमंत्री सुनेत्रा अजित पवार यांनी दिले. या 23 स्थानकांच्या मेट्रो मार्गिकेतील 12 स्थानके पूर्ण झाली असून, आणखी 5 स्थानकांचे काम अंतिम टप्प्यात असल्याची माहिती यावेळी देण्यात आली. उर्वरित कामांना गती देऊन हा प्रकल्प नागरिकांच्या सेवेत लवकरात लवकर आणण्यासाठी समन्वयाने काम करण्याच्या सूचना त्यांनी दिल्या.नदी प्रदूषण नियंत्रण प्रकल्पांना सर्वोच्च प्राधान्यपुणे महानगर प्रदेशातील इंद्रायणी, पवना, मुळा आणि मुठा नद्यांचे प्रदूषण रोखण्यासाठीचे प्रकल्प तातडीने मार्गी लावावेत. नद्यांचे प्रदूषण रोखण्यासाठी केवळ प्रकल्प उभारणे पुरेसे नसून, संबंधित यंत्रणा आणि संस्था स्वयंपूर्ण व आर्थिकदृष्ट्या शाश्वत होणे आवश्यक आहे. भविष्यातील देखभाल-दुरुस्ती आणि संचालनाचा खर्चही सक्षमपणे भागवता येईल, अशा पद्धतीने प्रकल्पांचे नियोजन करण्याच्या सूचना त्यांनी दिल्या.




साक़िया एक नज़र जाम से पहले पहले
हम को जाना है कहीं शाम से पहले पहले
अहमद फ़राज़

# गणेशोत्सव पर्यावरणपूरक पद्धतीने साजरा करण्याची जबाबदारी आपल्या सर्वांचीच – मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस

ठाणे, दि.10 : गणेशमूर्तीच्या भव्यतेपेक्षा भक्ती आणि पर्यावरण संवर्धनाला अधिक महत्व असून, गणेशोत्सवासारखा सांस्कृतिक वारसा जपणारा सण पर्यावरणपूरक पद्धतीने साजरा करणे, ही आपल्या प्रत्येकाची जबाबदारी आहे, असे प्रतिपादन मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी केले. वाशी येथील सिडको एक्झिबिशन अँड कन्व्हेन्शन सेंटरमध्ये आयोजित ‘पर्यावरणपूरक महा गणेश मूर्ती कार्यशाळा 2026’ मध्ये ते बोलत होते. या भव्य कार्यशाळेत एकाच वेळी तब्बल 10 हजारांहून अधिक विद्यार्थ्यांनी शाडूच्या मातीपासून पर्यावरणपूरक गणेशमूर्तींची निर्मिती करून ‘गिनीज बुक ऑफ वर्ल्ड रेकॉर्ड’मध्ये महाराष्ट्राच्या नावावर नवा जागतिक विक्रम नोंदवला.या ऐतिहासिक सोहळ्याला पर्यावरण व वातावरणीय बदल मंत्री पंकजा मुंडे, वनमंत्री गणेश नाईक, महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळाचे अध्यक्ष सिद्धेश कदम, आमदार मंदा म्हात्रे, आमदार रवींद्र फाटक, पर्यावरण व वातावरणीय बदल विभागाच्या सचिव जयश्री भोज, नवी मुंबईच्या महापौर सुजाता पाटील, नवी मुंबई महानगरपालिका आयुक्त कैलास शिंदे, ठाण्याचे जिल्हाधिकारी डॉ. श्रीकृष्ण पांचाळ आणि कला संचालनालयाचे संचालक डॉ. नितीन इंगळे यांच्यासह अनेक मान्यवर उपस्थित होते.मुख्यमंत्री फडणवीस यांनी उपस्थितांना संबोधित करताना सांगितले की, गणराया ही



बुद्धीची देवता असून आपल्या संस्कृतीत पर्यावरणाला अनन्यसाधारण महत्व आहे. सृष्टीची निर्मिती करणाऱ्या पंचमहाभूतांचे रक्षण झाले तरच मानवी जीवन सुरक्षित राहू शकते. मोठ्या गणेशमूर्ती, प्लास्टर ऑफ पॅरिस आणि कृत्रिम रंगांमुळे जलस्त्रोतांचे होणारे नुकसान टाळण्याचे आवाहन करताना ते म्हणाले की, मूर्ती लहान असो वा मोठी, भक्ती सारखीच असते. ईश्वराचा आशीर्वाद हा मूर्तीच्या आकारावर नव्हे, तर आपण पर्यावरण आणि समाजाची किती निस्वार्थ सेवा करतो यावर ठरतो.गिनीज वर्ल्ड रेकॉर्डच्या परीक्षकांनी निकाल जाहीर करताच मुख्यमंत्र्यांनी या यशाचे खरे शिलेदार सहभागी विद्यार्थी असल्याचे सांगत त्यांचे कौतुक केले. तसेच पर्यावरण मंत्री पंकजा मुंडे, पर्यावरण विभाग, जे. जे. स्कूल ऑफ आर्ट आणि कला संचालनालयाच्या प्रयत्नांची विशेष प्रशंसा केली. पर्यावरण मंत्री पंकजा मुंडे यांनी विद्यार्थ्यांचे मनःपूर्वक अभिनंदन करताना सांगितले की, शाडू मातीपासून बाप्पा घडवणाऱ्या या हजारो विद्यार्थ्यांनी स्वतःला ‘वसुंधरा रक्षक’ म्हणून सिद्ध केले आहे. संस्कृती जपत पर्यावरण रक्षणाचा हा संदेश घराघरात पोहोचविणे हाच या उपक्रमाचा मूळ हेतू आहे.ढोल-ताशांच्या मंगल गजरात आणि मूर्तिकारांच्या मार्गदर्शना खाली संपूर्ण परिसर भक्तिमय झाला होता. या कार्यशाळेचे मुख्य आकर्षण ठरले ते म्हणजे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस आणि पर्यावरण मंत्री पंकजा मुंडे यांनी स्वतः शाडू माती हातात घेऊन गणेशमूर्ती साकारली. राज्याच्या सर्वोच्च नेतृत्वाला आपल्यासोबत मूर्ती घडवताना पाहून विद्यार्थ्यांचा उत्साह शिगेला पोहोचला. आपण स्वतः करू शकतो तर प्रत्येक कुटुंबही पर्यावरणपूरक बाप्पा साकारु शकते, असा ठाम आणि प्रत्यक्ष कृतीतून दिलेला संदेश या उपक्रमाने संपूर्ण समाजाला दिला.शाळा-महाविद्यालयांचे विद्यार्थी, कला क्षेत्रातील तज्ज्ञ, प्राध्यापक आणि हजारो गणेशभक्तांच्या साक्षीने हा जागतिक विक्रम आणि पर्यावरण संवर्धनाचा जागर दिमाखात संपन्न झाला.

# महाराष्ट्र नवनिर्माण सेनेतर्फे डीजेवर बंदी घालण्याची मागणी; जिल्हा पोलीस अधीक्षक यांना निवदेन

अहिल्यानगर : गेल्या आठवड्यापासून डीजे बंदी वरून राज्यातील वातावरण तापले आहे.डीजेचा नागरिकांना प्रचंड त्रास सहन करावा लागत आहे, त्यामुळे डीजे नकोच अशी मागणी नागरिकांच्या वतीने मागणी जोर धरत असतानाच गणेश उत्सवातील दनदनाटाचा जणू ट्रेलरच शनिवारी दहीहंडी उत्सवात पाहायला मिळाले आहे. नुकतीच मुख्यमंत्र्यांचे शहर असलेल्या नागपूरतसेच सोलापूर या ठिकाणी डीजे वर बंदी घातली आहे. अहिल्यानगर मधे डीजेचा दणदणाट सुरूच असल्याने मुख्यमंत्र्यांच्या शहराला एक न्याय इतर शहरांना वेगळा न्याय हे कसे चालणार आहे. नगरमध्ये ही डीजेवर बंदी घालण्यात यावी असे निवेदन जिल्हा पोलीस अधीक्षक मुम्मका सुदर्शन यांना देण्यात आले यावेळी मनसेचे जिल्हाध्यक्ष सचिन डफळ, शहराध्यक्ष गजेंद्र राशीनकर, विद्यार्थी सेनेचे जिल्हाध्यक्ष प्रकाश गायकवाड, सचिव डॉ संतोष साळवे, उपाध्यक्ष तुषार हिरवे, संकेत व्यवहारे, विभाग अध्यक्ष प्रशांत जाधव, प्रविण गायकवाड, उपशहराध्यक्ष दीपक दांगट आदी उपस्थित होतेगणेश उत्सवाच्या काळात ध्वनी प्रदूषण डॉल्बी लेझर आणि मोठ्या आवाजाच्या साऊंड सिस्टिम वरून दरवर्षी चर्चा होत असतात. पोलीस प्रशासना कडून दरवेळेस सर्वच जाती धर्माच्या सणासुदींना बैठका घेऊन त्यांना नियम समजून सांगितले जातात, तसेच कार्यवाहीचा इशारादिला जातो, पण दरवेळेस ध्वनी प्रदूषणाचे थर वाढतच आहे. माझा आवाज मोठा की तुझा आवाज मोठा याची जणू काही स्पर्धाच लागलेलीआहे. डॉल्बी व लेझर लाईटला नागरिकांमधून विरोध वाढत आहे. विविध सामाजिक संघटनांकडून डीजे मुक्त उत्सवासाठी पुढाकार घेतला जात आहे, महाराष्ट्र नवनिर्माण सेना सुद्धा डीजे मुक्त उत्सव साजरा करण्यासाठी मंडळांना आवाहनकरणार आहोत, परंतु मानवी जीवितास तसेच पशुपक्ष्यांना घातक ठरणाऱ्या डॉल्बीचा दणदणाट गेल्या काही वर्षात सर्व सणासुदींना वाढतचाललेला आहे. याबाबत शासनाचे अनेक कायदे आहेत याची प्रभावी अंमलबजावणी होणे गरजेची झालेली आहे. सर्वच धार्मिक सणातील श्रद्धेचा आणि डॉल्बीचा कोणताही संबंध नाही, सर्वांना त्रासदायक ठरणाऱ्या डॉल्बीवर पूर्ण बंदी घालने काळाची गरज निर्माण झालेली आहे. डीजेच्या कर्ण करकश्य आवाजाचा सर्वाधिक त्रास ज्येष्ठ नागरिकांना सहन करावा लागत आहे, अनेकनागरिक आजारी असतात, घरोघरी लहान मुले असतात, त्यांना डीजेच्या आवाजाची भीती वाटत आहे. त्यामुळे याबाबत गांभीर्याने पाहण्याची आवश्यकता निर्माण झालेली आहे.

साप्ताहिक दर्शक
e-mail - weeklydarshak@gmail.com

IF UNDELIVERED
PLEASE RETURN TO
DARSHAK
DARSHAK BHAVAN,
726,OPP.DEPALI
THEATER ZENDIGATE,
AHMEDNAGAR-414001
MAHARASHTRA

Visit us
www.darshaknews.com
email- darshaknews81@gmail.com
weeklydarshak@gmail.com

TO,________________________

________________________

________________________